डॉ. विनोद पाटील
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

(MU Exam Mission – 2020)

मुंबई विद्यापीठ
महात्मा जोतिबा फुले भवन
परीक्षा विभाग, सांताक्रुझ (पू)
मुंबई ४०००९८

No. Exam/DBOEE/ICC/2020-21-10

**परीपत्रक :**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरीसराचे समन्वयक/संचालक, यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२०या वर्षातील अंतिम सत्र/वर्षाच्या परीक्षा हया बहूपर्यायी (Multiple Choice Question) पद्धतीने ऑनलाईन घेण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंतिम सत्र/वर्षाच्या परीक्षा हया बहूपर्यायी (Multiple Choice Question) ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

- परीक्षेच्या कालावधीत परीक्षा घेऊन निकाल जाहीर होई पर्यंत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, आणि उपप्राचार्य यांनी रजा घेऊ नये तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आवश्यकतेनुसार नियमित कार्यालयात हजर रहावे.

- सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी माहिती मिळावी किंवा विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास त्या सोडविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात Help Desk ची सुविधा उपलब्ध करुन दयावी.

- इतर महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/दूर व मुक्त अध्ययन संस्था यांचे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात रहात असतील व त्यांनी आपल्या महाविद्यालयास परीक्षेसाठी काही मदत मागितली तर ती सुविधा पुरविण्यात यावी.

पुढे ----२

- प्रत्येक महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांची Online पद्धतीने संवाद साधावा व परीक्षा विषयीची माहिती दयावी.
- प्रत्येक महाविद्यालयाने Sample Questions आपल्या महाविद्यालयाच्या Website वर upload केल्याबाबत व Mock Exam घेतल्याबाबतचा अहवाल आपल्या क्लस्टर मधील लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवावा. जेणे करुन लीड महाविद्यालयांचे प्राचार्य विद्यापीठास सदर अहवाल सादर करु शकतील.

वरील सर्व बाबींची नोंद घेऊन आवश्यतेनुसार संबंधीत समन्वयकांशी संपर्क साधुन योग्य ती कार्यवाही करावी तसेच परीक्षा सुरळीत व वेळेत पारपाडण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे ही विनंती.

**(डॉ. विनोद पाटील)**
**संचालक**
**परिक्षा व मुल्यमापन मंडळ**

**दिनांक** : २२/०९/२०२०
**ठिकाण : मुंबई**

**प्र**ति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठाच्या ठाणे, रत्नागिरी व कल्याण उपपरिसराचे समन्वयक/संचालक, सर्व उपकुलसचिव, परिक्षा विभाग.

अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) उपकुलसचिव, (जनसंपर्क) परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.

२) मा. कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.

३) मा. प्र–कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.

४) मा. कुलसचिव यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.

५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे, स्वीय सहाय्यक, परीक्षा विभाग,
मुंबई विद्यापीठ, सांताक्रुझ, मुंबई – ४०००९८.